


छाया: कांती ठक्कर

कुमुदलाल कुंजलाल गांगुली
अशोककुमार द ग्रेट

अशोककुमार अभिनेता, संगीतकार, गायक, ज्योतिषी, पेंटर, स्पोर्ट्समन आणि होमियोपथी डॉक्टर होते. ते एक हसतमुख व्यक्तिमत्त्व होतं ज्याला पाहून निराश माणसाच्या मनातही आशेचे अंकुर फुटावेत, त्यांच्या मधुर स्मृतींना उजाळा देण्याचा प्रयत्न...

□ अजित पोपट

'तुम्हाला माहीत आहे माझ्या जीवनातील सर्वात मोठी इच्छा कोणती आहे? मी अल्पायुषी आहे हे ज्योतिषाने सांगितलेलं भविष्य खोटं ठरवण्याची. आणि ती पूर्ण झाली आहे.' चार महिन्यांपूर्वीच १ ऑगस्ट २००१ रोजी आमचे 'जी'चे प्रतिनिधी दादामुनींना भेटले तेव्हा त्यांनी अशा शब्दांत गप्पांना सुरुवात केली. ते पुढे म्हणाले होते, 'आयुष्यात जे जे मिळवायचं ते मी कमावलं आहे. आता तर बस पलीकडचे वेध लागले आहेत. जेणेकरून भविष्य सांगणारा तो ज्योतिषी खोटा ठरेल...'

त्याचं असं झालं, अशोककुमारांचे पिता एका राजज्योतिषावर नितांत श्रद्धा ठेवत असत. त्यांनी अशोकजींच्या वडिलांना सांगितलं होतं – तुमचा एक मुलगा शतायुषी होईल. त्यावेळी वडिलांनी खूश होऊन त्याकाळी



अछूत कन्यामध्ये
नलिनी जयवंतसह



समाधीमध्ये
अशोककुमार-
नलिनी जयवंत



महलमध्ये मधुबालासह

चंदेरी पडद्यावर किंवा वास्तविक जीवनात दादामुनी असे मुक्त हास्याचा खळखळाट करत तेव्हा त्यांना पाहणाऱ्याला त्यांच्यात लहान मुलाचा भास होत असे. १९३० मध्ये उच्च शिक्षणाला महत्त्व होतं. तेव्हा बॅचलर ऑफ सायन्सची डिग्री घेऊन दादामुनी लॅब असिस्टंट होण्याच्या हेतूने मुंबईत आले. अभिनेता बनण्याचा तर त्यांनी स्वप्नातही विचार केला नव्हता. कारण त्याकाळी विद्या विभूषित समाजात अभिनेत्याला कमी लेखलं जायचं. 'होय, मी खरं तेच सांगतोय. माझा स्वतःचा अनुभव तसाच आहे.' हास्याचा गडगडाट करत अशोककुमारजींनी भूतकाळात डोकावलं आणि तो प्रसंग आज घडल्यासारखा वर्णन केला. 'आई-वडिलांच्या सांगण्यावरून मी मुलगी बघायला गेलो होतो. त्यावेळी माझ्या भावी सासऱ्यांनी मला विचारलं, मुंबईला काय करतोस. मी मुखर्जीबाबूंकडे पाहिलं. (शशधर मुखर्जी आणि दादामुनी दोघं मेव्हणे होते.) त्यांनी दादामुनींना डोळा मारला. त्यांनी पुन्हा विचारलं, 'मुंबईला काय करता?' मी उत्तर दिलं, 'ॲक्टर आहे.'

आपल्या पायाखाली एखादा बॉम्ब फुटावा तसे सगळेजण जागीच उभे राहिले. मीसुद्धा मुखर्जीबाबूंबरोबर जागचा उठलो आणि चालता झालो. पण आश्चर्याची गोष्ट अशी की पुढे त्याच मुलीशी माझं लग्न झालं. तिने माझ्या चढत्या आणि पडत्या काळात सावलीसारखी माझी साथ दिली. पण मला अकाली सोडून पुढे निघून गेली.'

लॅब असिस्टंट होणार होतात मग अभिनयाकडे कसे वळलात? यावर दादामुनी पुन्हा हसले, 'अरे, बॉम्बे टॉकीजचा एक पगारी अभिनेता होता, नझमल हुसेन. कंपनीचे मालक-निर्माता हेमांशू राय यांची पत्नी देविका राणी त्याची नायिका होती. चित्रपट होण्याआधीच दोघं नायक-नायिका पळून गेले. हेमांशू राय खंबीर मनाचे होते. त्यांनी पळालेल्या दोघांना पोलिसांकरवी पकडून आणलं. हीरोला बाहेरचा रस्ता दाखवला आणि मला म्हणाले, 'उद्यापासून तू हीरो...'

कुमुदलाल गांगुलीचं नामकरण अशोककुमार असं झालं. पण कुमुदलाल अभिनेता बनायला तयार नव्हता. आता हिमांशू रायना नकार कसा द्यायचा? मग कुमुदलालने आपलं डोकं भादरून टाकलं. दुसऱ्या दिवशी टकल्या कुमुदलालला बघून सेटवर जो-तो हैराण. आता या मुलाची खैर नाही. पण कुमुदलालला तसं पाहून हिमांशू राय सात मजली हसले आणि म्हणाले, 'आता तुला अभिनेता बनवलं नाही तर नावच बदलीन.'

पण कुठे तो हॅण्डसम, उंच नजमल हुसेन आणि कुठे हा अगदी नवोदित कुमुदलाल? तू चित्रपटात काम करणार? असं समोरून दिलीपकुमारला विचारणाऱ्या देविका राणीची कुमुदलालशी वागणूक मात्र हाडतुडीची असायची. कदाचित त्याचवेळी अशोककुमारने मनोमन निश्चय केला असावा की आता हिला चांगला हीरो बनूनच दाखवेन. आणि दुसऱ्या तिसऱ्या चित्रपटापासूनच अशोककुमार हे नाव सर्वतोमुखी झालं. एका दशकात तर ते स्टारपदी पोहोचले. अशोककुमारचा *किस्मत*सारखा चित्रपट तीन वर्षं सिनेमागृहात तळ ठोकून होता.

साधारणपणे सात दशकांची अभिनय कारकीर्द असलेल्या अशोककुमारनी सहाशेपेक्षा अधिक चित्रपटात अनेकविध भूमिका साकारल्या. दिलीप-राज-देव यांच्या उदयानंतरही दीडेक दशकं गेल्या जमान्याचा अभिनेता अशोककुमार नायक म्हणून पडद्यावर राज्य करत होता. हिंदी चित्रपटांचा सुवर्णकाळ ज्याला म्हणता येईल त्या दशकात दादामुनीच अभिनयाचा हुकमी एक्का म्हणून ओळखले जात होते.

त्याला पन्नास रुपये दक्षिणा दिली होती.

पण किशोरकुमारच्या अकाली मृत्यूमुळे आधीच हळवे झालेले दादामुनी नंतर अनुपकुमार गेल्यामुळे अगदीच एकाकी पडले. आता मी शंभर वर्षं जगून काय करू? पत्नी गेली, धाकटी भावंडं सोडून गेली. आता कोणासाठी शंभर वर्षं जगायचं? मी तर इच्छामरणासाठीही तयार आहे. १० डिसेंबरला दादामुनींना काळाचं बोलावणं आलं तेव्हा आपण त्या राजज्योतिषाची भविष्यवाणी खोटी ठरवली म्हणून दादामुनी मनातल्या मनात नक्कीच त्याला हसले असतील.

दिलीपकुमार बरोबर *दिदार*, देव आनंदबरोबर *ज्वेलथीफ*, राजेंद्रकुमारबरोबर *कानून*, प्रदीपकुमारबरोबर *आरती* आणि *चित्रलेखा*, सुनील दत्तबरोबर *गुमराह*, संजीवकुमारबरोबर *आशिर्वाद*...

त्यांच्या भूमिकांचं वैविध्यही कसं– बी.आर.चोप्रांच्या *कानून*मध्ये न्यायाधीशांची भूमिका साकारण्याआधी जवळजवळ महिनाभर रोज हायकोर्टात जाऊन ते जजचं निरीक्षण करत. त्यांच्यासोबत राहत. तर *आरती*मध्ये डॉक्टरची भूमिका साकारायची तर ओळखी-पाळखीच्या डॉक्टर मित्रां वर नजर ठेवत. *चित्रलेखा*मध्ये साधूची भूमिका असो नाहीतर ममतामध्ये वकिलाची! दादामुनींनी प्रत्येक व्यक्तिरेखा जिवंत केली.

ज्वेलथीफ पहिल्यांदाच पाहणाऱ्यांना त्यात अशोककुमार खलनायक आहे याची पुसटशीही कल्पना येत नसे. आणि *आशिर्वाद*? डॉक्टर हरीन्द्रनाथ चट्टोपाध्याय यांच्याबरोबर जोगी ठाकूरच्या भूमिकेत अशोककुमारने अप्रतिम अभिनय केलाय. शिवाय 'रेलगाडी...' हे गीतही गायलं. चित्रपट संगीतात एक वेगळी घटना म्हणून नोंदलं गेलं. *चलती का नाम गाडी*पासून *व्हिक्टोरिया नंबर २०३* आणि *धर्मा* या चित्रपटांतली अशोककुमारची कॉमेडी आजही लक्षात राहते. *मेरे मेहबूब*मध्ये, *पाकिजा*मध्ये त्यांनी सादर केलेल्या उमरावची भूमिका अभिनयाच्या सीमा पार करून गेल्यासारख्या वाटतात. देशातील पहिलावहिला रहस्य चित्रपट महल ('आयेगा आनेवाला...' फेम) अशोककुमारचा होता.

ते फक्त अभिनेताच होते असं नाही तर संगीतकार, गीतकार, ज्योतिषी, पेंटर, स्पोर्ट्‌समन, होमियोपथी डॉक्टरही होते. मीनाकुमारीच्या लिव्हर किडनीच्या आजारावर उपचार करण्याचे त्यांनी अथक प्रयत्न केले होते. मीनाकुमारी, नलिनी जयवंत, मधुबाला, नरगीस, निम्मी, नूतन, माला सिन्हा, निरुपा रॉय वगैरे अभिनेत्री त्यांचं तोंड भरून कौतुक करत. आशा पारेख तर आजही म्हणते– *मेरी सुरत तेरी आँखे*सारख्या नॉनग्लॅमरस रोलसाठी कोणता आघाडीचा अभिनेता तयार होईल?

आणि 'चित्रलेखा-जी' परिवाराचे तर ते निकटचे स्नेही होते. 'जी'चं नामकरण करण्यासाठी तेच निमित्त होते. म्हणून अशोककुमार (दादामुनी) ना अखेरचा निरोप देताना 'चित्रलेखा-जी' परिवारासाठी आपल्या कुटुंबातील एक वयोवृद्ध हरपल्याचं दुःख कधीही भरून न येणारं आहे. गांगुली परिवाराला हा आघात सहन करण्याची शक्ती परमेश्वर देवो हीच प्रार्थना!

जीवनयात्रा

जन्मः १३ ऑक्टोबर १९११, **शिक्षणः** बी.एस्सी., लॉ, **पहिली नोकरीः** बॉम्बे टॉकीजमध्ये लॅब असिस्टंट कम असिस्टंट कॅमेरामन, **पहिला अभिनयः** *जीवननैया* (१९३६), **पहिली नायिकाः** देविका राणी, **पहिला सुपरहिट चित्रपटः** अछूत कन्या, **सुपरहिट जोडीः** देविका राणी, नलिनी जयवंत आणि लीला चिटणीस यांच्यासह, **कुटुंबः** पत्नी शोभा (निधन १९८७), तीन मुली-भारती, रूपा, प्रीती मुलगा-अरुप, **अविस्मरणीय चित्रपटः** *अछूत कन्या, कंगन, बंधन, झूला, वचन, निर्मला, महल, किस्मत, कानून, परिणीता, बंदिश, चलती का नाम गाडी, हावडा ब्रिज, राखी, पूजा के फूल, ममता, बंदिनी, उंचे लोग, मेरे मेहबूब, बहूबेटी, आशिर्वाद, पाकिजा, व्हिक्टोरिया नं. २०३, मिली, खुबसूरत, शौकीन.* **मालिकाः** हमलोग, आखरी मुगल.



कानूनमध्ये न्यायाधीशाच्या भूमिकेत



पाकिजामध्ये मीनाकुमारीसह



दूरदर्शन मालिका *आखरी मुघल*मध्ये मुख्य भूमिकेत